1. शिरीष हा ---- वर्षाचा छोटासा मुलगा होता. (सुलभ)
2. कोकणचा निसर्ग ----- खूप आवडत होता. (सुलभ)
3. ढिगारयाखाली ---- होते. (सुलभ)
4. संगीताला ---- ओरडणे अशक्य झाले. (सुलभ)
5. शिक्षकांना फार ----- वाटले. (सुलभ)

प्रश्न 2 रा. जोड्या जुळवा

1. भाजी विकणारा	वीर बालक	(सुलभ)
2. दगड व बिया	गोंडस	(सुलभ)
3. शिरीष.	पैसे	(सुलभ)
4. गुटगुटीत	बागवान	(सुलभ)

प्रश्न ३ रा. समानार्थी शब्द लिहा.

1.मित्र - (सुलभ)
2. आई - (सुलभ)
3. ढग - (सुलभ)
4. तोंड - (सुलभ)
5. पान - (सुलभ)

प्रश्न 4 था. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) शिरीष कोठे रहात होता? (साधारण)

2) शिरीषचा आवडता खेळ कोणता? (साधारण)

3) ती दोघे कशासाठी घराबाहेर गेली होती? (साधारण)

4) संगीताला ओरडणे अशक्य का झाले? (साधारण)

5) सरकारने शिरीषचा कसा गौरव केला? (साधारण)

प्रश्न 5 वा. योग्य अक्षरे वापरून शब्द तयार कर.
(श,च,म,ना,वा)

1) ना --- दार. (साधारण)

2) रघु --- थ. (साधारण)

3) थ -------- (साधारण)

4) पि ------ वी. (साधारण)

5) र ------ ना (साधारण)

प्रश्न **6** वा. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिही.

1) शिरीष व संगीता खेळासाठी कोणते साहित्य वापरत असत? (कठीण)

2) संगीता कोणत्या अडचणीत सापडली? (कठीण)

3) संगीताला वाचविण्यासाठी शिरीषने प्रश्न काय केले? (कठीण)

पाठ 16

माझे गाव

प्रश्न १ ला.योग्य पर्याय निवडा

1.गावाच्या पूर्वेला काय आहे ?

क) डोंगर (ख) पर्वत (ग) दरी घ) हिमालय

2.नदी कोणत्या दिशेला वाहते ?

क)पूर्व (ख) पश्चिम (ग) दक्षिण घ)उत्तर

3.पश्चिमेला काय आहे ?

क)घर (ख)दार (ग)जमीन (ग)शेत

4.मन लावूनिया काय करावे ?

(क) शिका (ख)हसा (ग)वाचा (ख)लिहा

5.केव्हा खेळावे असे कवीने सुचविले आहे ?

क) सकाळी ख) दुपारी ग) रात्री घ) संध्याकाळी

6.आमराई या शब्दाचा अर्थ लिहा.

क) केळीची बाग

ख) आंब्याची बाग

ग) द्राक्षाची बाग

घ) पेरूची बाग

प्रश्न २ रा. जोड्या जुळवा.

7. पूर्वेला - नदी

8. पश्चिमेला - माझी शाळा

9. उत्तरेला - देवाचा डोंगर

10. दक्षिणेला. - माझे घर

प्रश्न ३ रा. समानार्थी शब्द लिहा.

11.देव -

12.नदी -

13.घर -

14.आई -

15.माया -

16.फुल -

प्रश्न ४ था. एका वाक्यात उत्तरे लिहा.

17. घरात कोण कोण राहतात असे कवी म्हणतो ?

18. कवितेतील आजोबा कोण ?

19. चार प्रमुख दिशांची नावे लिहा?

20. माझे गाव कवितेचे कवी कोण ?

21. शाळा गावाच्या कोणत्या दिशेला आहे ?

22 . गावावर माया कोणाची आहे?

प्रश्न 5 वा. खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा .

23.गावाच्या उत्तरेकडील परिसराचे वर्णन कसे केले आहे ?

24.घराच्या परिसरात कोणकोणती झाडे आहेत ?

25. गावातील बालकांना कवीने कोणता संदेश दिला आहे ?

पाठ 17

शकुन अपशकुन

प्रश्न 1. योग्य पर्याय शोधा.

1. रामू काका व दिनू काका लहान पासूनचे काय होते?

A. शेजारी B. मित्र C. वर्गमित्र D. शत्रु

2. दिनू काकांनी आपल्या घरी काय पाळले होते?

A. शेळी B. गाय C. मांजर D. ससा

3. दार उघडताच कोण आडवे आले?

A. गाढव B. कुत्रा C. मांजर D. बैल

4. चोरी कोणाच्या घरी झाली?

A. रामू काका B. दिनू काका C. हरी काका D. बाळू काका

5. दांडगा या शब्दाचा अर्थ काय?

A. मोठा B. छोटा C. उंच D. लांब

प्रश्न 2. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

6. रामू काका व दिनू काका .... काम करीत होते.

7. रामू काका .... लावून घ्यायला विसरले.

8. .... आडवे गेले त्याचाच हा परिणाम.

9. आपण .... दृष्टिकोन जोपासावा.

10. पावसाळ्यामुळे दारात खूप .... झाली होती.

प्रश्न 3. जोड्या लावा.

A	B
11. शकुन	संध्याकाळ
12. आवडता	रात्र
13. सकाळ	अपशकुन
14. दिवस	पराजय
15. जय	आवडता

प्रश्न 4. समानार्थी शब्द लिहा.

16. सूर्य
17. पाणी
18. मित्र
19. पृथ्वी
20. नदी

प्रश्न 5. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

21. दिनू काकांना रामू काका पडल्याचे केव्हा समजले?
22. रामू काकांच्या मित्राचे नाव काय?
23. रामू काकांचे मांजर कसे मरण पावले?
24. रामुकाकांनी मांजराला शिव्या का दिल्या?
25. रामू काकांचा कशावर विश्वास होता?

प्रश्न 6. कंसातील शब्द पाहून पाळीव प्राणी व जंगली प्राणी यांची विभागणी करा.

26. (वाघ, कुत्रा, अस्वल, शेळी, बैल, मांजर, सिंह, हत्ती, गाय, कोल्हा, ससा, गाढव, लांडगा)

प्रश्न 7. दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.

27. दिनू काकांनी रामू काकाला काय समजावून सांगितले?

28. प्राणी व पक्षी यांच्यावर का प्रेम केले पाहिजे?

29. घरी चोरी होऊ नये म्हणून आपण कोणती खबरदारी घ्यावी?

30. पाळीव प्राण्यांचे कोणते फायदे आहेत?

पाठ 18

संतवाणी

अध्ययन निष्पत्ती-

1. प्रासबद्ध शब्द ओळखतात. नवीन शब्दांची ओळख करून घेतात.
2. योग्य विरामचिन्हांचा वापर करून लेखन करतात.
3. नीतिमूल्ये विकसित होतात .

नील नकाशा

उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी

अध्ययन उद्दिष्टे	शेकडा गुण	गुण	प्रश्न
ज्ञान	33.33%	10	10
आकलन	40%	12	12
अभिव्यक्ती	13.33%	4	2
प्रशंशा	13.33%	4	1
एकूण	100%	30	25

काठीण्य पातळीनुसार गुणाची विभागणी

काठीण्यस्तर	शेकडावर गुण	गुण
सुलभ	65%	20
साधारण	25%	7
कठीण	10%	3
एकूण	100%	30

प्रश्न 1ला योग्य पर्याय निवडा .

1. जीव या शब्दाला यमक जुळणारा शब्द .... (सुलभ)

अ. मदत ब. आई क. भाव ड. प्राण

2. माता शब्दाचा समानार्थी शब्द........ (सुलभ)

अ. बाबा ब. काका क. मित्र ड. आई

3. निष्ठूर म्हणजे........... (साधारण)

अ. कडक ब. सुलभ क. वाईट ड. खरे

4. प्रेम शब्दाचा विरुद्धार्थी शब्द .... (साधारण)

अ. आवड ब. द्वेष क. प्रेम ड. आनंद

5. दागिने घडवितो तो......... (सुलभ)

अ. कुंभार ब.सोनार क. शिंपी ड. चांभार

6. बाबा या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता? (सुलभ)

अ. काका. ब. वडील क .आई. ड .मामा

7. यापैकी कोणते नाव संतांचे नाव नाही. (साधारण)

अ. संत तुकाराम ब. संत ज्ञानदेव क.संत नामदेव ड. संदीप

8. निर्वाणी या शब्दाचा अर्थ. (कठीण)

. अ .कठोर ब. विसरु नये क. कठीण प्रसंगी ड. धिक्कार

प्रश्न 2 रा खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा .

9. कोणाशी निष्ठुरपणे वागू नये ? (सुलभ)

10. ज्याने अन्न दिले त्याचे काय मोडू नये ? (सुलभ)

11. कोणाला विसरू नये ? (सुलभ)

12. कोणाला धिक्कारु नये ? (सुलभ)

13. तुकाराम महाराज काय म्हणतात ? (सुलभ)

प्रश्न 3 रा जोड्या जुळवा.

14. अन्न	माता	(सुलभ)
15. जीव	प्रेम	(सुलभ)
16. कामा	भाव	(सुलभ)
17. आता	मन	(सुलभ)
18. उपकार	निष्ठुर	(सुलभ)

प्रश्न 4 था वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

19. भंगू नये (कठीण)

20. हेळू नय (कठीण)

प्रश्न 5 वा कवितेच्या ओळी पूर्ण करा. (सुलभ)

ज्याने केला....................................

....

....

.... मन

प्रश्न 6 वा दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1. आपण इतरांशी कसे वागावे असे तुकाराम म्हणतात ? (कठीण)

2. संत तुकाराम महाराजांविषयी माहीती लिहा ? (कठीण)

प्रश्न 7 वा मोकळ्या जागा भरा.

1. चप्पल शिवतो तो. .... (साधारण)

2. मुलांना शिकवितो तो. .... (साधारण)

3. रोज बागेला पाणी घालतो तो. .... (साधारण)

4. गरज सरो. .... (साधारण)

5. सोनारानेच कान .... (साधारण)

6. गवयाचं पोर सुरातच .... (साधारण)

7. कसायाला गाय .... (साधारण)

प्रश्न 8 वा संतांची नावे शोधून लिहा. (सुलभ)

ना	र	व	ला	की
त	श्व	मु	प	तु
मा	ने	सी	व	का
स	ज्ञा	दे	ता	रा
त	म	का	ती	म
ना	ए	क	ना	थ

प्रश्न 9 वा योजना कार्य.

1. संत तुकारामांचे अभंग जमवून लिहा . (कठीण)
2. वीणा चे चित्र काढा. (कठीण)

उत्तर सूची

1 भारत गौरव गीत

1 देश	2 बापू	3 सन्मान	4 उन्नत
5 जग	6 सारखे, प्रमाणे	7. सुंदर	8.झाड
10 राष्ट्र	11 मोठा	12 कमी	13 असमान
14 दुराभिमान	15 जन्म	16 नारी	

17. कवी भारत मातेचे गौरव गीत गात आहे.
18. भारताची पावन नदी गंगा होय.
19. आमचा देश महान आहे.
20. कवीला मरणाचे वरदान देशासाठी हवे आहे.
21. नीलाकाशी तिरंगी झेंडा फडकत आहे.
22. बापूचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी.
23. लहान
24. नाती
25. पडले
26. प्राण
27. तूच आमुचा मान
28. मरणाचे वरदान
29. आज तिरंगी निशाण
30. वेचिले प्राण
31. देशासाठी महात्मा गांधी, राणी लक्ष्मीबाई ,पन्ना व जनता लढली.
32. भारत देश महान आहे. येथे विविध जातीचे ,धर्माचे लोक राहतात . येथे पवित्र गंगा नदी आहे.

2 . भारत माता

उत्तर पत्रिका

प्रश्न 1ला. योग्य पर्याय निवडा

1. पुणे
2. सावित्रीबाई फुले
3. माणूस
4. बाळ गंगाधर टिळक

प्रश्न 2रा. खालील शब्दांचा योग्य क्रम लावून वाक्य तयार करा.

5. देशाबद्दल स्वाभिमान असावा.
6. देश सेवा ही ईश्वर सेवा होय.
7. मातृभूमि ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे.

प्रश्न 3.रा समानार्थी शब्द लिहा.

8. जनता- लोक
9. बाप- वडील
10. पृथ्वी – धरती

प्रश्न 4था. विरुद्धार्थी शब्द लिहा.

11. शक्य× अशक्य
12. अंधार× प्रकाश
13. उपकार × अपकार

प्रश्न 5.वा खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

14. आई गजानन वर रागावली.
15. लोकमान्य टिळकांची मैत्री गजानन च्या बाबाशी होती.

16.	शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला.

17.	लोकमान्य रात्रंदिवस भारत मातेची पूजा करत असत भारत मातेची पूजा करत असत.

प्रश्न 6.वा खालील प्रश्नांची उत्तरे दोन वाक्यात लिहा.

18.	महाराष्ट्रातले पुणे हे शहर पूर्वीपासून ज्ञानाचे माहेरघर. विचारवंताचे शहर, ऐतिहासिक महत्त्वाचे शहर, भारतात अनेक जुन्या चालीरीती, अंधश्रद्धा होत्या. त्यांचे निर्मूलन करून नवीन परंपरा निर्माण करणारे शहर म्हणून ओळखले जाते.

19.	टिळक व गजानन चे वडील यांच्यामध्ये भारतातील ज्ञान,अंधश्रद्धा,शिक्षण इत्यादी गोष्टीवर चर्चा होत असे.

प्रश्न 7.वा खालील वाक्य कोणी कोणाला म्हटले ते लिहा.

20.	हे वाक्य गजाननने आईला म्हटले.

21.	हे वाक्य गजाननाने लोकमान्य टिळकांना म्हटले.

३. दारोदारी एक झाड

उत्तर पेढी

1. योग्य पर्याय उत्तर निवडून लिहा

1.C. पटांगणात

2.D. झाडे लावणे

3.C. सात जुलै

4.A. आंबा

5.C. औषधी

6. लहान रोपटे

7. लहान कच्चे आंबे

8. कैरीचे सरबत

9. शरीरावरील कातडीला होणारे रोग

10. मोठा उत्सव, सण

11. शुभप्रसंगी पानांचे तोरण बांधले जाते.

12. मी तुळशीचे रोप आणले आहे.

13. तुळशीच्या रोपामुळे प्राणवायूचा पुरवठा भरपूर होतो.

14. सारीच झाडे उपयुक्त आहेत.

15. झाडामुळे हवा शुद्ध राहते.

16. आण ,मरण ,रण ,मर

17. महा ,भारत ,भात ,मत ,मर ,हार ,हात

18. राख, खण ,दार ,खरा , रण

19. हिरवा, गार ,वार, रवा, गारवा

20. जन, जाग ,रण ,गर ,जागर, नगर, जण ,जाण

21. वन, महोत्सव, नव ,मन होम

22. वन महोत्सव म्हणजे वनाचा मोठा उत्सव .म्हणजेच झाडांचे महत्त्व ओळखून झाडे लावणे व ती जोपासणे होय.

23. आपल्या देशात दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे .त्यामुळे विकासासाठी

प्रचंड प्रमाणात झाड तोडली जात आहेत. त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी होत आहे.

24. जंगलांच्या नाशा मुळे उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. याचा मानवी जीवनावर दुष्परिणाम होत आहे .हे सर्व टाळण्यासाठी झाडे लावून वन महोत्सव साजरा केला जातो.

6. खालील प्रश्नाचे तीन ते चार वाक्यात उत्तर लिहा.

25. बेंगळुरू हे शहर ग्रीन सिटी म्हणून ओळखले जाते. कारण बेंगळुरू हे शहर मोठे असून सुद्धा येथे प्रदूषण कमी आहे शिवाय जिथे मोकळी जागा आहे तिथे सुंदर बगीचे आहेत .म्हणूनच बेंगळुरू शहराला ग्रीन सिटी अथवा बगीच्यांचे शहर असे म्हणतात.

४ . स्वच्छता गीत

उत्तरपत्रिका

प्रश्न 1: चूक की बरोबर

1. चूक
2. चूक
3. बरोबर
4. चूक
5. बरोबर

प्रश्न 2: जोड्या जुळवा

1. कचरा – कुंडी
2. स्वच्छ – परिसर
3. आंबले शिळे – अन्न
4. आंघोळ – नेहमी करावी
5. तुंबली गटारे – मोकळी करावी

प्रश्न 3: नमुन्या प्रमाणे लिहा

1. कप – बशी
2. चालणे – पळणे
3. उठणे – बसणे
4. खाणे – पिणे
5. फेकणार – टाकणार

प्रश्न 5: रिकाम्या जागा भरा

1. स्वच्छ
2. रोगजंतू
3. रोग
4. घाणेरडी
5. विषारी

प्रश्न 6: एका वाक्यात उत्तरे

1. प्रत्येकाने आपले घर व गाव स्वच्छ ठेवावे.
2. तुंबलेल्या गटाराचे मोकळी करणार आहे.
3. कागद रस्त्यावर फेकू नये.
4. बिया, साले, कचरा कुंडीत टाकावा.
5. आंघोळ नेहमी स्वच्छतेसाठी करावी.
6. 'स्वच्छता गीत' या कवितेचे कवी अनुसया व्यं. कुंभार आहेत.

प्रश्न 7: तीन–चार वाक्यांत उत्तरे

1. मी घरात आणि शाळेत स्वच्छता राखतो. मी कचरा कुंडीतच टाकतो. वर्गात आणि शौचालयात स्वच्छता ठेवतो. मी दररोज अंघोळ करतो व स्वच्छ कपडे घालतो.

2. चांगल्या सवयी: दररोज अंघोळ करणे, स्वच्छतेकडे लक्ष देणे, कचरा कुंडीत टाकणे.वाईट सवयी: कचरा रस्त्यावर टाकणे, घाणीत खेळणे, शिळे अन्न खाणे.

5. मी किल्ला बोलतोय

उत्तर पत्रिका

1. २. राघव गुरूजी
2 . १. चौथी
3. 3. भुईकोट
4. 4. १००
5. 1. १३ व्या
6. 2. दुर्गा माता
7. सहलीला बेळगावी ला जायचे ठरविले आहे.
8. किल्ला चौथीच्या मुलाबरोबर बोलत होता.
9. राघव गुरुजींनी सहलीचे नियोजन केले होते.
10. भुईकोट किल्ल्याच्या दक्षिणेला कमल बस्ती आहे.
11. खंदक म्हणजे किल्ल्याच्या भोवतालचा चर.
12. सहलीला सरकारी बस मधून प्रवास करायचा आहे.
13. किल्ला
14. आश्रम
15. मंदिर
16. जिल्हा
17. प्रदूषणामुळे
18. कमल बस्ती
19. मन
20. पूजा
21. प्राचीन
22. हिम्मत
23. आई
24. फुल

25. दुःख

26. कुरूप

27. रडणे

28. शत्रु

29. सहलीमध्ये भुईकोट किल्ला, दुर्गा माता मंदिर, रामकृष्ण मठ, पुरातन कमल बस्ती येथील शिल्प कलाकृती पहायचे ठरविले होते.

30. सहलीसाठी येताना जेवणाचा डबा, वॉटर बॅग, वही, पेन, छोटासा टॉवेल इत्यादी साहित्य आणण्यास सांगितले होते.

6. परोपकारी नरेंद्र

I. 1. 12 जानेवारी 1863

2. भुवनेश्वरी देवी

3. नरेंद्र

4. नाविक

5. देबुदा

6. विश्वनाथ दत्त

7. निघून जाणे

8. डॉक्टर

9. कलकत्ता

10.4 जुलै 1902

II. 11. धक्का, प्रहार

12. कसरत

13. डॉक्टर

III.

14. व्यायाम शाळेत

15. देबुदाच्या

16. जखम

17. नाविक

18. स्वामी विवेकानंद

IV. 19 परोपकारी

20 पाहुणचार

21 परदेशी

22 परावलंबी

23 परममित्र

VI.

24 कुंभकर्ण. झोपाळू

25 नारद कळलाव्या

26 बकासुर खादाड

27 कर्ण दानशूर

28 हनुमान बलवान

VI. 29. हळहळणे -खेद किंवा शोक करणे

कुत्र्याचं तडपण पाहून माझे मन हळहळले.

30. गहिवरणे-कंठ दाटून येणे किंवा मन भरून येणे

छोट्या नरेंद्र चे मन किती मोठे आहे, हे पाहून देबुदाचे मन गहिवरून आले.

VII. 31. साखळी देबुदाच्या डोक्यावर आदळली.

32. देबुदाच्या डोक्यावर साखळी पडल्यामुळे तो रक्तबंबाळ झालेला पाहून व्यवस्थापक व व्यायामपटूंनी तेथून पळ काढला.

33. देबुदाला दवाखान्यात नरेंद्र घेऊन गेला.

34. विवेकानंदाच्या गुरूंचे नाव रामकृष्ण परमहंस असे होते.

35. विवेकानंदांचा जन्मदिवस राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करतात.

36. व्यायाम शाळेत जोर, कुस्ती, बैठका, मल्लखांब, वजन उचलणे, साखळ्यांना धरून लोंबकळणे इत्यादी प्रकार केले जातात.

VIII. 37. स्वामी विवेकानंद यांनी जगाला असे सांगितले की, 1.गरिबांची आणि गरजू लोकांची सेवा करा. 2. उठा जागे व्हा आणि ध्येयप्राप्तीपर्यंत थांबू नका. 3. ध्येय निश्चित करा आणि ते प्राप्त करण्यासाठी कठोर परिश्रम करा.

38. व्यायाम शाळेत लोंबकळणारी साखळी कड्यापासून तुटून देबुदाच्या डोक्यावर आदळली त्या आघाताने तो बेशुद्ध होऊन पडला.

39. नरेंद्र धावत देबुदाकडे गेला व्यायाम शाळेतील कापूस व पट्टी शोधून काढली देबुदाची जखम स्वच्छ करून त्याला पट्टी बांधली आणि घोडा गाडीत घालून उपचारासाठी वैद्याकडे घेऊन गेला अशी मदत केली.

40. देबुदा हा एक नाविक होता गंगा नदीत नाव चालून आणि मासेमारी करून तो आपला संसार चालवीत असे त्याला बायको व तीन मुले होती.

7. कधी वाटते

1) आ) रूप

2) इ) माकड

3) अ) पेढे बर्फी

4) ई) मोर

5) अ) शतरंगाचे

6) आ) पेरू

7) इ) शेकडो रंग

8) इ) झोके

9) ई) कबूतर

10) आ) खाऊन संपवणे

II. प्रासयुक्त शब्दांच्या जोड्या जुळवा (सुलभ)

अ.	ब
11. व्हावे	देखावे
12. झोका	मोका
13. जाईन	येईन
14. पिसारा.	पाऊस धारा
15. चावे	देखावे

III. एका वाक्यात उत्तरे लिहा (सुलभ)

16. कवीला हिरव्या वनराईतून स्वैर मुक्त फिरावे असे वाटते.

17. वनराई हिरवी आहे.

18. माकड झाल्यावर मित्रांना छळण्याचा मोका आपल्याला मिळतो.

19 माकड झाले की सकाळ-संध्याकाळी हिरवे पेरू खाता येईल अशी तो कल्पना करतो.

20. मुंगी झालो तर बरणी मधील पेढे बर्फी फस्त करता येईल असे कवीला वाटते.

21. हाती सापडली तर मुंगी हाताचे चावे घेते.

22. पाऊस धारा सुरू झाल्या की मोर नाचतो.

23 मोर होऊन आकाशातील शतरंगांचे देखावे पहावेत असे कवीला वाटते.

24. कवितेमध्ये माकड मुंगी मोर इत्यादी प्राणी-पक्ष्यांचा समावेश केला आहे.

25.कधी वाटते या कवितेचे कवी प्रवीण दवणे हे आहेत.

IV. अनेक वचन लिहा (साधारण)

26. पेढे

27. माकडे

28. देखावे

29. चावे

30.रंग

V. खालील प्राण्यांचे निवासस्थान लिहा (साधारण)

31. माकड - झाड

32. मुंगी - वारूळ

33. मोर - वन

34. गाय - गोठा

VI. वचन बदला (साधारण)

35. खिडकी - खिडक्या

36. फुल - फुले

37. घर - घरे

38. शाळा - शाळा

VII. खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यात उत्तरे लिहा ? (कठीण)

39. माकड झाल्यानंतर खूप खूप करत उंच झोका घेता येतो. मित्रांना छळण्याचा मोकासुद्धा मिळतो. रोज

सकाळ संध्याकाळी हिरवे पेरू खायला मिळतात. म्हणून कवीला माकड व्हावे असे वाटते.

40. मुंगी होऊन कवीला दुकानात जायचे आहे. बरणीमध्ये ठेवलेले पेढे बर्फी फस्त करायचे आहेत. कोणाच्या हाती सापडलो तर हाताचे चावे घ्यायचे आहेत.

41. मोर झाल्यानंतर भर्जरी पिसारा फुलवता येईल. अंगणातून खुशाल नाचत पाऊसधारा झेलता येतील.

आकाशातील शतरंगाचे देखावे पाहता येतील.

42. मी हत्ती झाल्यानंतर सोंडेमध्ये पाणी भरून मित्रांच्या अंगावर उडविन. लहान मुलांना सोंडेने उचलून पाठीवर

बसवेन. मोठमोठी लाकडे अलगदपणे वाहून आणीन.

43. जर मी मुंगी झालो तर बरणीमधले पेढे बर्फी खाईन. आईने फराळाचे पदार्थ कुठे ठेवले आहेत ते शोधून

काढून फस्त करेन. जर कोणी माझी छेड काढली तर त्याच्या हाताचे अनेक चावे घेईन.

44. पेरू खेरीज माकड आंबे खाते. चिंचा खाते. माकडाला शेंगाही खायला खूप आवडतात. तसेच विविध

ऋतूमध्ये येणारी विविध फळे सुद्धा माकडाला खायला आवडतात.

45. मुंगीचा स्वभाव हा कष्टाळू असतो. मुंगी पावसाळा सुरू होण्याआधी आपल्या अन्नधान्याची साठवणूक

करते. मुंगीचा स्वभाव हा काटकसरी असतो. येईल त्या परिस्थितीला मुंगी सहनशीलपणे सामोरे जाते. हे

गुणधर्म मुंगीपासून आपल्याला घेण्यासारखे आहेत.

46. अशी विविध रूपे घेतल्यामुळे कवीला निसर्गामध्ये मुक्तपणाने वावरता येईल. माकडाच्या जीवनाचा आनंद

घेता येईल. मुंगीच्या पेढे बर्फी खाण्याचा आनंद घेता येईल. मोराच्या पिसारा फुलवण्याच्या आणि पाऊसधारा

झेलत शतरंगी देखावे पाहण्याचा आनंद विविध रूपातून कवीला घेता येईल असे वाटते.

VIII. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा ? (साधारण)

47. होऊन हूप हूप माकड
घ्यावा उंच झोका
मित्रांना मग छळण्याचा
येईल हाती मोका

48. कधी होऊनी मोर.........

....

....

..................पाऊस धारा

8. खो - खो

उत्तर : 1) क) 12

2) अ) आवडता

3) ड) निरोगी

4) अ) भारत

5) ब) आयताकार

6) अ) 07

7) अ) मैदानावर

8) क) रक्षण

9) चेजर्स

10) रनर्स

11) पाठलाग

12) कौशल्य

13) खो देणे : नकार देणे.

14) सूर मारणे : घाईत उडी मारणे.

15) हळहळणे : जीव तीळ तीळ तुटणे.

16) काढता पाय घेणे : परिस्थिती पाहून निघून जाणे.

17) आक्रमक संघाचा नववा पोलजवळ उभा राहतो.

18) क्रिकेट, कब्बडी, बुध्दीबळ आणि लगोरी

19) एका वेळी बचाव संघाचे तीन खेळाडू पळतात.

20) आमरण : आम, मर, रण, मरण

21) महाभारत : भारत, हात महा, हार

22) जनजागरण : रण, जन, जागरण, जागर

23) हिरवेगार : हिरवे, गार, गारवा

24) दिवाणखाना : दिवाण, दिवा, खाज,

25) भारतमाता : माता, भार, भारत

26) दिन : दिवस : :   दीन : गरिब किंवा दुबळा

27) गृह : घर   : :   ग्रह : तारे

28) सुत : धागा   : :   सूत : मुलगा किंवा पूत्र

29) एकच खेळाडू पाठलाग करतो, उर्वरित आठ खेळाडू चौकटीत बसलेले असतात. पोलकडे गेल्यानंतर मात्र चेजर्स संघाचे खेळाडू त्यांची दिशा बदलू शकतात.

30) खो देणे, दिशा बदलणे, सूर मारणे, खांबांच्या बाजुने सफाईदारपणे पळणे, कोंडीतून निसटणे इत्यादी कौशल्ये

जोपासली जातात.

9. फेसाठी सामना

उत्तरपत्रिका

अ)

1 बोकड

2) लंगडी

3) लांडगा

4) कासव

5) हत्ती

आ)

1) पंचांची

2) षटकार

3) क्रिकेट

4) उंट

5) मान

इ)

अ	ब	उत्तर
1	1	कोल्हा
2	2	हत्ती
3	3	उंट
4	4	ससा
5	5	उंदीर मामा

ई) 1) मांजर क्रिकेट खेळ खेळू लागले.

2) प्रेक्षकांचा घसा दुखू लागला.

3) हत्तीने षट्कार मारताच आनंदाने चित्कार केला.

4) वाघोबाचा अवतार पहाताच पंचांची हॅट उडते.

5) उंदीर मामाची विकेट पहिल्याच ओव्हरमध्ये पडते.

उ)

1) कासव दादाला वेगाने धावता येत नाही. म्हणून कासवदादाने आपण बॅटिंग करत असताना रनर घेतला.

2) अखेर जेव्हा वाघोबा आपल्या हातात बॅट घेतात. त्यावेळेचा वाघोबाचा अवतार पहाताच पंचांची हॅट उडते.

ऊ)

1) हत्ती बॅटिंगला आल्यानंतर बॉल येताच आपल्या सोंडेमध्ये बॅट धरून जोरात फिरवून एक षटकार मारतो. आपण मारलेल्या षटकारामुळे आनंदाने चित्कार देत आपला आनंद व्यक्त करतो.

2) कोल्हा हा चतुर प्राणी आहे. त्याने आपल्या चतुराईने विरुद्ध बाजूच्या लांडग्याला आपल्या बाजूने खेळ फिरविण्यासाठी फितूर केले. हा चतुरपणा कोल्ह्याने केला.

*****

पाठ 10) अडाणी खेडूत

उत्तरपत्रिका

प्रश्न 1)योग्य पर्याय निवडा.

1)चष्मा

2) चष्मा

3)निरक्षर

4)शहरात

5)उलटे

6)संशयाने

7)स्पष्ट

प्रश्न 2) जोड्या जुळवा.

8) अडाणी –इ)अज्ञानी

9) निरक्षर – ड)लिहिता वाचता न येणारा

10) तऱ्हेतऱ्हेचे – अ)वेगवेगळे

11) खेडूत –ब)खेडकरी

12) मुश्किलीने –क)कष्टाने

प्रश्न 3)एका वाक्यात उत्तरे लिहा.

13) अडाणी खेडूत शहरात एक चष्मा आणण्यासाठी गेला होता.

14) चश्म्यामुळे आपल्याला फक्त स्पष्ट दिसू शकते.

15) आंधळेपणाचे मूळ कारण अज्ञान आहे.

16) खेडूताने पुस्तक उलटे धरले होते.

17) खेडुताला लिहिता वाचता येणारा चष्मा हवा होता.

18) फक्त चष्मा लावला म्हणजे वाचता येते हा खेडूताचा गैरसमज होता.

19) कारण फक्त चष्मा लावला म्हणजे मला इतरांसारखे वाचता येईल असे त्याला वाटत होते.

प्रश्न 4)विरुद्धार्थी शब्द लिहा.

20) सुशिक्षित ×अशिक्षित

21)शहर ×गाव,खेडे

22) विश्वास ×अविश्वास

23)शत्रु ×मित्र

24) कठीण ×सोपे

25) साक्षर×निरक्षर

प्रश्न 5 वा) कंसातील शब्दांचा वापर करून वाक्य पूर्ण करा.

26) व्यवस्थित दिसण्यास मदत करणारी वस्तू –चष्मा

27) लिहिता वाचता न येणारा –निरक्षर

28) दुकानातील वस्तू खरेदी करणारा –गिऱ्हाईक

29) लिहिता वाचता येणारा-साक्षर

30) दुकान चालविणारा-दुकानदार

प्रश्न 6 वा) कोणी कोणास म्हटले ते लिहा.

31)खेडूताने दुकानदाराला म्हटले.

32)खेडूत स्वतःला म्हणाला.

33)दुकानदाराने खेडुताला म्हटले.

34)खेडूताने दुकानदाराला म्हटले.

35) दुकानदाराने खेडुताला म्हटले.

प्रश्न 7 वा) दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा .

36)खेडूत अडाणी होता.लिहायला वाचायला येत नव्हते हि त्याची खरी अडचण होती.

37)दुकानदाराने खेडुताला अनेक चष्मे दाखवले आणि वाचण्यासाठी एक पुस्तक घेतले पण खेडूताने सगळे चष्मे डोळ्याला लावून पाहीले तरीही कोणता चष्मा माझ्या उपयोगाचा नाही असे तो म्हणाला तसेच त्या खेडूताने पुस्तक वाचताना उलटे धरले होते .यावरून दुकानदाराला संशय आला कि खेडुताला वाचताच येत नसावे.

38)खेडूत निरक्षर होता त्याला अजिबात लिहिता वाचता येत नव्हते.लोक पुस्तक किंवा पेपर वाचताना चष्मा लावतात हे तो नेहमी पाहत असे.

प्रश्न 8 वा) चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा.

39)जर मला लिहिता वाचता येत नसेल तर दुकानातील किंवा बाजारातील हिशेब समजणार नाही,परगावी गेल्यावर बसचे फलक वाचता येणार नाहीत ,छान छान गोष्टी व गाण्यांची पुस्तके वाचायची मजा येणार नाही ,दैनंदिन व्यवहार करताना अडचणी येतील.

40)चष्म्यामुळे कोणासही लिहिता वाचता येत नाही .चष्म्यामुळे आपल्याला फक्त स्पष्ट दिसू शकते तू आधी लिहायला ,वाचायला शिक.मग तुला चष्म्याशिवायसुध्दा वाचता येईल.

11. पत्रलेखन

1. निसर्ग सौंदर्याने
2. मुरडेश्वर
3. विश्रामगृह
4. अत्यंत
5. भेळपुरी ,चाटची

प्रश्न 2रा

1 .जंगल

2.डोंगर

3.दरी

4.झाडी

5.घर

प्रश्न 3रा

अ) 1..श्रीमंत

2.मोठा

3.गोड

4.खाली

5.खोटे

ब) 1.वृक्ष

2.जल

3.माता

4.पिता

5.मंदिरातील गोपुरे

प्रश्न 4था

1. वरील पत्र स्नेहलने प्राजक्तास लिहीले.

2. स्नेहलची सहल निसर्ग रम्य अशा मुरडेशवर या ठिकाणी गेली होती.

3. नारळाच्या झावळयांमधून आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या शंकराच्या मूर्तीचे दर्शन होते.

4. मुरडेशवर मंदिर हे शिल्पकलेचा व कलाकुसरीचा उत्तम नमूना आहे.

5. मधल्या टेकडीवर पर्यटकांसाठी   अलिशान विश्रामगृह आहेत.

प्रश्न 5वा

1.मुरडेशवराचा किनारा अत्यंत सुरक्शित आहे.समुद्र स्नानाची मौज मनसोक्त लुटता येते.

2.समुद्रकिनाऱ्यावर कलाकुसरीच्या साहित्याची तसेच भेळपुरी,चाटची दुकाने आहेत.

3.मुरडेशवराच्या समुद्रकिनाऱ्यावर शंख शिंपले धरतांना स्नेहलला प्राजक्ताची आठवण आली.

4.पोस्टकार्ड,पोस्ट पाकिटे,पोस्ट तिकीटे या वस्तु पोस्टात मिळतात.

5. समुद्र किनाऱ्याचे चित्र.

12. बारा महिने

प्रश्न पहिला.

1. झाडांना नव्या पालवीचा मोहर चैत्र महिन्यामध्ये येतो.

2. सृष्टी हिरव्या रंगांनी श्रावण व भाद्रपद महिन्यात नटलेली दिसते.

3. झेंडूची फुले पिवळी धम्मक दिसतात.

4. आयुष्य मार्गशीर्ष महिन्यात झाडे झडु लागतात.

5. वर्षाचा पहिला महिना चैत्र.

प्रश्न दुसरा.

6. ज्येष्ठ आषाढ जलधारा

वर सोसाट्याचा वारा

श्रावण भादव न्हालेले

हिरव्या रंगी नटलेले.

प्रश्न तिसरा.

7. चैत्र वैशाख ज्येष्ठ आषाढ श्रावण भाद्रपद अश्विन कार्तिक मार्गशीर्ष पौष माग फाल्गुन.

8. बहराचा-मोहराचा धारा-वारा न्हालेले-नटलेले झडे-सडे

9. पिवळा-धम्मक लाल-भडक काळा-कुट्ट निळा-भोर पांढरा-शुभ्र

10. जानेवारी फेब्रुवारी मार्च एप्रिल मे जून जुलै ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर नोव्हेंबर डिसेंबर.

11. ऑक्टोंबर नोव्हेंबर डिसेंबर जानेवारी

12. जून जुलै ऑगस्ट सप्टेंबर.

प्रश्न चौथा

13. चैत्र

14. वैशाख

15. माघ

16. फाल्गुन

17. कार्तिक

18. आषाढ.

19. श्रावण

20. भाद्रपद

21. अश्विन

प्रश्न पाचवा

22. बारा

23. रंग

24.दिन

25.सूत

26.उसंत

प्रश्न सहावा.

27. मकर संक्रांत जानेवारी

28. दिवाळी   कार्तिक

29. दसरा   अश्विन

30. गणपती भाद्रपद

31. गुढीपाडवा चैत्र.

प्रश्न सातवा

32. भाद्रपद महिना

33. नवीन महिना

34. मार्गशीर्ष महिना

प्रश्न आठवा.

गुलाब शेवंती चाफा मोगरा जास्वंदी कमळ जाई जुई सोनचाफा अबोली मोगरा.

13. खरा नायक

उत्तरपत्रिका

१) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा:

1. या पाठात 10 पात्रांचा समावेश केलेला आहे.

2. अंकांची सुरुवात शून्यापासून होते.

3. जगात सूर्य, चंद्र, पृथ्वी, पाणी, हवा हे एकच आहेत.

4. बैलगाडीला 2 चाके असतात.

5. पंचमहाभूते 5 आहेत.

6. मुख्य दिशा 4 आहेत.

7. उपदिशा 4 आहेत.

8. षटकोनाला 6 कोन असतात.

9. आठवड्याचे दिवस 7 आहेत.

10. एका हाताला 5 बोटे असतात.

२) रिकाम्या जागा भरा:

11. तीन तिघडा **काम** बिघडा.

12. हाताची बोटे **पाच** असतात.

13. ग्रह **नऊ** आहेत.

14. शून्याचा **विजय** असो.

15. वासरात **लंगडी** गाय शहाणी.

16. अष्टभुजा कृतीला **आठ** बाजू असतात.

17. सायकल ला **दोन** चाके असतात.

18. षटकोनाला **सहा** बाजू असतात.

19. पृथ्वीवर **सात** खंड आहेत.

20. जगात **चार** **वेद आहेत.**

३) जोड्या जुळवा:

21. शून्य – खरा नायक

22. एक – सूर्य

23. दोन – नाण्याचा बाजू

24. तीन – पळसाची पाने

25. चार – दिशा

26. पाच – हाताची बोटे

27. सहा – ऋतू

28. सात – ऋषी

29. आठ – ग्रह

30. नऊ – साहित्यातील रस

४) विरुद्धार्थी शब्द लिहा:

31. बसणे – उभे राहणे

32. देव – राक्षस

33. डावा – उजवा

34. मोठा – लहान

35. मालक – नोकर

36. नायक – खलनायक

37. सूर्य – चंद्र

38. चांगला – वाईट

39. प्रकाश – अंधार

40. रात्र – दिवस

५) खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिहा:

41. दिशा 4 आहेत – पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण. या दिशांना उपदिशाही आहेत.

42. आठवड्याचे 7 वार आहेत – सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, रविवार.

43. वेद चार आहेत – ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद. हे वेद जगाला ज्ञान देतात.

६) खालील प्रश्नांची उत्तरे तीन चार वाक्यात लिहा:

44 एक – सूर्य, चंद्र, पृथ्वी हे एकच असतात.

दोन – डोळे, हात, नाण्याला बाजू दोन असतात.

तीन – त्रिशूळ, बेलपत्र, पळसाची पाने तीन.

चार – मुख्य दिशा, उपदिशा आणि वेद चार.

पाच – हाताची बोटे, पंचमहाभूते पाच.

45. सहा – सहा ऋतू, षट्कोन, षड्रस.

सात – सात खंड, सप्तस्वर, सप्तऋषी.

आठ – अष्टदिक्पाल, अष्टप्रधान, अष्टकोन.

नऊ – नवरस, नवरत्ने, नवरात्र.

शून्य – इतर अंकांच्या बाजूला बसून त्यांची किंमत वाढवतो.

46.सर्व अंक आपापसात भांडत होते, पण शेवटी शून्याने आपली किंमत सांगितली.

शून्य एकाच्या उजवीकडे आल्यास संख्या दहा होते, नंतर शंभरही होतात.

शून्यामुळे इतर अंकांचे मूल्य वाढते हे सर्वांनी मान्य केले.

म्हणून सर्वांनी शून्याला 'खरा नायक' मानून खुर्चीवर बसवले.

14 . शेतकरी गीत

१. c) लवकर २. a)पूर्व ३. d) आकाश

४. c) मावळणे ५. b) खूपजण ६. b) मृग

७. a) लवकर ८. b)जमीन ९. c) खूपखूप

१०. a) सोबती ११. a)राबूया १२. b)पवन

१३. a) हालने १४. d) ब व क १५.b)भात

१६.शेतात----गगनात

१७.शेताला - - - पेरणीला

१८.डुलतयं - - - झालयं

१९.कापणीची - - - मळणीची

२०.जोडूया - - - खपुया

२१.भरूया - - - जाऊया

२२.शेताला

२३.गगनात

२४.मिरग

२५.मोत्यासारखे

२६.पेरणी

२७.वाऱ्याने

२८.शेतडुलण्यानं

२९.भाताच्याशेताला

३०.कापणीची

३१.मळणीची

३२.भात

३३.ढवळ्यापवळ्या

३४.सोबतीने

३५.धान्यानं

३६.घराला

३७.भात,नाचणा, जोंधळा, मुग, उडीद.

३८.भात,नाचणा,मिरची, वांगी.

३९.आंबा,पेरू,चिक्कू,फणस.

४०.गुलाब,चाफा,जास्वंदी, सदाफुली.

४१.	बैल	-	ढवळ्या पवळ्या
	रातदिन	-	रात्रंदिवस
	जोंधळा	-	धान्य
	सूर्य	-	भास्कर

४२. बिगीबिगी चल जाऊ शेताला
दिवस उगवलाय गगनात
मिरगाचा पाऊस आलाय रं
मोत्याचे पीक आता पिकलं रं
जाऊया समदे शेताला
झपझप लागुया पेरणीला.

15 साहसी शिरीष

उत्तर पत्रिका:

1)1. सात

2. शिरीषला

3. गटार

4. दूषित हवेमुळे

5. कौतुक

प्रश्न 2) जोड्या जुळवा (सुलभ) .

1. बागवान

2. पैसे

3. वीर बालक

4. गोंडस

प्रश्न ३) समानार्थी शब्द लिहा (सुलभ)

1. मित्र--सखा

2. आई--माता

3. ढग--नभ

4. तोंड--मुख

5. पान--पर्ण

प्रश्न 4) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा (साधारण).

1) शिरीष होडावाडा या गावी रहात होता.

2) भाजी विकणारा बागवान हा त्यांचा आवडता खेळ होता.

3) ती दोघे खेळण्यासाठी घराबाहेर गेली होती.

4) दूषित हवेमुळे संगीताला ओरडणे अशक्य झाले.

5) वीर बालक म्हणून शिरीष चा सरकारने गौरव केला.

प्रश्न 5) योग्य अक्षरे वापरून शब्द तयार कर. (साधारण)

1.पिशवी

2. रचना

3. नामदार

4. रघुनाथ

5. थवा

प्रश्न 6) खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिही. (कठीण)

प्रश्न 6) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) शिरीष व संगीता खेळासाठी झाडांचे पाणी छोटे बटाटे मुळे काकडी यांना फळे व छोटे दगड व बिया हे पैसे समजून खेळ खेळायचे.

2) संगीता ढिगाऱ्यावर पाय ठेवली तो ढिगारा पालापाचोळा व शेणाचा होता ढीगाराखाली गटार होते त्या गटारात खाली पडली व संगीता जोरात ओरडू लागली अडचणीत सापडली.

3) संगीताला वाचविण्यासाठी शिरीष ने पळत जाऊन बाजूला पडलेला एक मोठा बांबू आणला व त्याने संगीताच्या आता जवळ नेला तिने पकडले वजन कमी असल्यामुळे सर्व शक्ती पणाला लावून वर खेचण्यास सुरुवात केली शिरीष च्या प्रयत्नांनी संगीता कमरेपेक्षा वर आली धोका टळला अशा प्रकारे शिरीष ने संगीताला वाचवले

पाठ 16 माझे गाव

उत्तर पत्रिका

1) डोंगर 2) उत्तर 3) घर

4) शिका 5) सायंकाळी 6) आंब्याची बाग

7) पूर्वेला - देवाचा डोंगर

8) पश्चिमेला - माझे घर

9) उत्तरेला - नदी

10) दक्षिणेला - माझी शाळा

11) देव - ईश्वर

12) नदी - सरिता

13) घर - सदन

14) आई - जननी

15) माया - प्रेम

16) फुल - पुष्प

17) घरात आई बाबा ताई राहतात असे कवी म्हणतो.

18) कवितेतील आजोबा उभादेवाचा डोंगर आहे.

19) पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर चार दिशांची नावे आहेत.

20) माझे गाव कवितेचे लेखक कुसुमाग्रज आहेत.

21) शाळा गावाच्या दक्षिणेला आहे.

22) गावावर माया आजोबाची आहे.

23) गावाच्या उत्तरेला नदी मायाबाई वाहते नदीकाठी भरलेली शेत म ळेव सावलीला आमराई आहे.

24) घराच्या परिसरात पारिजात आणि अंगणात जाई जुईची झाडे आहेत

25) गावातील बालकांना कवीने मन लावून शिकावे व सायंकाळी खूप खेळावे असा संदेश दिला.

17. शकुन अपशकुन

उत्तर पत्रिका

प्रश्न.1- 1- B. मित्र

2. C. मांजर

3.C. मांजर

4.A.रामुकाका

5.A.मोठा

प्रश्न.2.- 6. शेतात

7. दरवाजा

8. मांजर

9. वैज्ञानिक

10. निसरड

प्रश्न.3- 11. शकून. - अपशकून

12. आवडता - नावडता

13. सकाळ - संध्याकाळ

14. दिवस - रात्र

15. जय - पराजय.

प्रश्न.4- 16. भास्कर

17. जल

18. सखा

19. धरती

20. सरिता

प्रश्न.5- 21. दिनू काकांना रामु काका पडल्याचे संध्याकाळी समजले.

22. रामू काकांच्या मित्राचे नाव दिनू काका असे होते.

23. रामू काकांचे मांजर मोटर कार खाली सापडून मरण पावले.

24. सकाळी उठल्याबरोबर मांजर आडवे गेले त्यामुळे चोरी झाली, असे समजून रामुकाकांनी मांजराला शिव्या दिल्या.

25. रामू काकांचा शकुन अपशकुन यावर विश्वास होता.

प्रश्न.6- 26.

पाळीव प्राणी.	जंगली प्राणी
कुत्रा	वाघ
शेळी	अस्वल
बैल	सिंह
मांजर	हत्ती
गाय	कोल्हा
गाढव	लांडगा
	ससा

प्रश्न.7- 27. सकाळी दरवाजा लावून घेतला नाहीस म्हणून चोरी झाली आणि गडबडीने जाताना दारात निसरड झाल्यामुळे पडलास त्यात मांजराची काय चूक असे समजावले.

28. आपल्या प्रमाणे त्यांनाही भावना असतात, त्यांना प्रेमाची गरज असते,निसर्गात संतुलन राहते, प्राणी व पक्षी आपल्याला उपयोगी आहेत म्हणून त्यांच्यावर प्रेम केले पाहिजे.

29. चोरी होऊ नये म्हणून आपल्या वस्तू व्यवस्थित सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात, दरवाजे खिडक्या व्यवस्थित बंद कराव्यात.

30. कुत्रा घराची राखण करतो, गाय म्हैस दूध देतात, बैल शेतात काम करतात, शेतात घालण्यात शेणखत मिळते, कोंबडी अंडी देते, तसेच इतरही फार उपयोग आहेत.

18 .   संतवाणी

उत्तर पत्रिका

प्रश्न 1 ला.

1 भाव

2. आई

3. क डक

4. द्वेष

5. सोनार

6. वडील

7. संदीप

8. कठीण प्रसंगी

प्रश्न 2 रा.

1. ज्याने आपल्यावर उपकार केला त्याच्याशी निष्ठुर वागू नये.

2. ज्याने आपल्याला अन्न दिले त्याचे कधीच मन मोडू नये.

3. कठीण प्रसंगी जो मदत करतो त्याला विसरू नये.

4. मातेला आपण करू नये.

5. आपल्या मातेला आपण कधीच धिक्कारू नये असे संत तुकाराम महाराज म्हणतात.

प्रश्न तिसरा

1. अन्न मन

2. जीव भाव

3. कामा प्रेमा

4. आता माता

5. उपकार निष्ठुर

प्रश्न चौथा

1. भंगू नये = विसरू नये

आपल्या आई वडिलांच्या प्रेमाला आपण कधीच भंगू नये.

2. हेळू नये = तिरस्कार करू नये

गरीब माणसांना हेळू नये.

प्रश्न पाचवा

ज्याने केला उपकार
त्याची नसावे निष्ठूर
ज्याने दिले अन्न
त्याचे मोडू नये मन

प्रश्न सहावा

1. आपण सर्वांशी प्रेमाने वागले पाहिजे. आपल्यावर उपकार केलेल्या ,कठीण प्रसंगी मदत केलेल्या व्यक्तीला नेहमी आठवणीत ठेवावे .आपल्या आई-वडिलांचा नेहमी आदर करावा असे संत तुकाराम महाराज म्हणतात.

2. तुकाराम महाराजांना संत तुकाराम म्हणून ओळखले जाते .त्यांचे पूर्ण नाव तुकाराम ओल्होबाअंबिले. हे एक महान मराठी संत आणि कवी होते .त्यांनी भरपूर अभंग लिहिले. त्यांच्या अभंगातून त्यांनी समाजाला समता, प्रेम आणि भक्तीचा संदेश दिला आहे.

प्रश्न सातवा

1. चांभार 2. शिक्षक 3. माळी 4. वैद्य मरो

5. सोनारानेच कान टोचावेत 6. रडतं 7. धार्जिण

प्रश्न आठवा

तुकाराम , ज्ञानेश्वर , एकनाथ ,नामदेव

प्रश्न 9.वा (योजना कार्य)

जे का रंजले गांजले
त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा

देव तेथेची जाणावा.

सुंदरते ध्यान उभे विटेवरी
कर कटावरी ठेवोनिया
तुळशीहार गळा कासे पितांबर
आवडे निरंतर हेचि ध्यान
मकर कुंडले तळपती श्रवणी
ठीक कौस्तुभनी विराजित
तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख
पाहीन श्रीमुख आवडीने

प्रश्न 10 वा

विना वाद्याचे चित्र पाहून मुले काढतील.

---

ii